17/02/2023

# पोलिसांच्या कामगिरीचा विशेष पोलीस महानिरीक्षकांकडून गौरव



मुदखेड,दि. १६ (ता.प्र.)– फायनान्स कंपनीच्या एजंटांना भर दिवसा खंजर व तलवारीचा धाक दाखवून २५ जानेवारी रोजी लुटणाऱ्या चार सराईत गुन्हेगारास वेळीच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जेरबंद करून त्यांना जेलची हवा दाखवीत लुटमारीचा गुन्हा उघडकीस आणून धडाकेबाज कामगिरी करत जिल्हा पोलीस दलात आपले वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक व चार पोलीस अमलदारांचा त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष पोलीस महानिरीक्षक महावकर व जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन नुकताच गौरव करण्यात आला आहे.

पोलिसांनी आपल्या कल्पकतेतून या दोन्ही लूटमारीच्या घटना उघडकीस आणण्यासाठी तपासास प्रारंभ केला आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा गुन्हा उघडकीस आणून चार सराईत आरोपींना वेळीच जेरबंद केले. त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सदर पोलीस कर्मचाऱ्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन जिल्हा पोलीस दलाच्या वतीने तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू वटाणे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बालाजी गीते ,पो.हे. का. चंद्रशेखर मुंढे,पो .हे. का .रवी लोहाळे ,पो.हे .का विजय आल्लेवार, पो.हे .का. विनायक मठपती, यांचा नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक एस .एच. महावरकर, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन नुकताच गौरव करण्यात आला. प्रशस्ती पत्र प्राप्त सर्व पोलीस कर्मचारी बांधवांचे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा नांदेड ग्रामीण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी गौहर हसन ,भोकरचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे, तत्कालीन पोलीस निरीक्षक महेश शर्मा, संजय कोलते , कुणाल चौधरी, यांच्यासह अन्य पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे कौतुक केले.